# ई-निविदा सूचना क्र.१
# ग्रामपंचायत फेटरी ,
# प.स.नागपूर, जि.प.नागपूर
# सन २०२६ – २०२७

| अनु क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजे किमंत | निविदा फी | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Providing Paving Blocks at Fetri - 2025 – 2026 | 400214/- | रु. 590/- ( Online ) | 4100/- (Online) | 3 महिने | ई निविदा दि. 14/05/2026 सकाळी 11.00 वा. ते दि. 21/05/2026 ला दुपारी 02.00 वा. पर्यंत स्वीकारण्यात येईल.<br><br>निविदा दि. 22/05/2026 दुपारी 02.00 वा नंतर उघडण्यात येईल. |

सरपच
ग्राम पचायत फेटरी
त. जि. नागपुर

सचिव
ग्राम पंचायत फेटरी
त.जि नागपुर

## निविदेतील सर्वसाधारण अटी व शर्तीचा तपशील

1) निविदाधारकाला www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य राहील.
2) कार्यालयामार्फत विविध कामासाठी ऑनलाईन बी-1 निविदेमध्ये नोंदणीकृत कंत्राटदारांनी (फक्त जि.प. नोंदणीकृत कंत्राटदार) खालीलप्रमाणे अटी व शर्ती नुसार निविदा सादर करणेआवश्यक आहे.
3) www.mahatenders.gov.in या लिंकवरून कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा अटी व शर्ती व इतर आवश्यक माहिती ऑनलाईन पाहण्यासाठी उपलब्ध्द होईल.
4) नोंदणीकृत कंत्राटदारांनी (फक्त जि.प. कडील वैध नोंदणी कंत्राटदार) स्वत:चे ऑनलाईन अकाउंट उघडून घ्यावे, तसेच आवश्यक ते सर्व मूळ दस्ताएवज स्कॅन करून अपलोड करावे.
5) इसारा रक्कम (EMD) कंत्राटदार यांनी ऑनलाईन द्वारे संबंधित कंत्राटदाराच्या बँक खात्यातून जमा करणे बंधनकारक राहील व सदर रक्कम विहित खात्यातुनच जमा करण्यात आलेली आहे. याबाबत

खात्याचे विवरण निविदा सादर करतांना सोबत जोडावे अन्यथा आपणास निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

6) सदर निविदेकारिता कंत्राटदार नोंदणी ग्रामविकास विभागाकडे यथायोग्य श्रेणी बंधनकारक राहील.

7) निविदा सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर प्रथम वेळेस फक्त एकच निविदा प्राप्त झाल्यास तांत्रिक लिफाफा न तपासता दुसऱ्यांदा निविदा प्रसिद्ध करण्यात येईल. प्रथम वेळेस दोन पात्र निविदा प्राप्त झाल्यास स्पर्धा होणे शक्य असल्याने आर्थिक बोलीचा लिफाफा उघडण्यात येईल. दुसऱ्या वेळेस एकच पात्र निविदा प्राप्त झाल्यास ती स्वीकारण्यात येईल. पात्र निविदा जास्त दराची असल्यास मंजुरी करिता सक्षम प्राधीकरणाकडे मंजुरी करिता पाठविण्यात येईल किंवा निविदा फेटाळण्याचे अधिकार ग्रामपंचायत ला राहील.

8) अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance security Deposit) अंदाजपत्रकीय दराच्या १०% पेक्षा अधिक दराने कमी असलेल्या निविदा करिता अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम निविदा धारकांनी निविदा उघडल्यानंतर ०८ कार्यलयीन दिवसाच्या आत DD चे स्वरुपात स्वीकारण्यात येईल. DD सरकारी, शेड्युल तसेच सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत बँकेची असावी. अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम भरण्याची ०८ दिवसाची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथिलक्षम असणार नाही. ठराविक कालावधीत अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम जमा न केल्यास निविदा धारकाची इसारारक्कम जप्त करण्यात येईल. तसेच निविदाधारकास निविदा उघडल्याचे दिनांकापासून ०२ वर्षासाठी निविदा भरण्यासाठी अपात्र घोषित करण्यात येईल. अशा परिस्थितीत सदर कामाकरिता नवीन निविदा न मागविता L-2 निविदाधारक सदर काम L-1च्या दरापेक्षा जास्त कमी दराने व त्याच अटी व शर्तीनुसार काम करण्यास तयार असेल तरच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम शासन निर्णय क्रमांक सी एस टी /2017/प्र.क्र.08/इमा-2 दिनांक 27/09/2018 नुसार L-2 निविदाधारकाची निविदा स्वीकृत करण्यात येईल.

८.१) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर निविदाधिन कामाच्या १% परंतु कमीत कमी रुपये १०००/- (उदा. ०.०% ते १०% कमी दर १% किंवा १००० जर जास्त असलेले)

८.२) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १५ % पर्यंत जास्त कमी दराने असेल तर देकार १% पेक्षा जेवढा जास्त कमी दराने आहे. तेवढी रक्कम वरील मुद्दा क्रमांक ८.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे परंतु कमीत कमी रुपये १०००/-( उदा. 15% पेक्षा जेवढा कमी असल्यास १०% पर्यंत १% व वरील ५% असे एकूण ६%)

८.३) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 15% पर्यंत जास्त कमी दराने असल्याने उर्वरित रकमेसाठी मुद्दा क्र.८.२ प्रमाणे ६% अधिक 15% पेक्षा जेवढा जास्त कमी दराने आहे त्याच्या दोन पट्टीने रक्कम परंतु कमीत कमी रुपये १०००/- (उदा- 19% पेक्षा कमी दराने असल्यास )

10% कमी दारापर्यंत = 1%

15% कमी दारापर्यंत = (15 % -10%) =5%

तसेच 19% =(19%-15%)=4%X2 =8%

असे एकूण (1+5+8)= 14%

८.४) सदर DD हा सरपंच/सचिव ग्रामपंचायत फेटरी यांच्या नावे असावा. सदर डी.डी. /बँक प्रतिभूती हमी/बँकेचा धनाकर्ष /मुदत ठेव प्रमाणपत्र कंत्राटदारांनी स्वतःचे कंपनीचे खातेतून काढलेला असावा.

८.५) प्रथम न्यूनतम देकार सादर करणारा L-1 निविदाधारक ज्या दिनांकास वरील मुद्दा क्र.८.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्या दिनांकापासून दोष दायित्व कालावधीनंतर (DEFECT LIABILITY PERIOD) एक महिना इतक्या कालावधीपर्यंत हमीच्या मुदत असावी.

८.६) वरील पद्धतीमध्ये खोटी कागदपत्रे /धनाकर्ष /FDIR/बँक ग्यारंटी दुरुस्ती सादर करणाऱ्या कंत्राटदाराची इसारा (EMD) रक्कम जप्त करण्यात येईल व सदर कंत्राटदारावर शासन निर्णय क्रमांक सीएसटी/2017/प्रक्र 08/इमा-2 दिनांक 27/09/2018 4.6.5 नुसार कार्यवाही करण्यात येईल याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

८.७) काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे कंत्राटदाराला प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम विहित कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल.

9) **कंत्राटदाराने तांत्रिक लिफाफा मध्ये जोडावयाची कागदपत्रे**

१) वैद्य नोंदणी प्रमाणपत्र (फक्त जिल्हा परिषद)

२) पॅनकार्ड

३) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र

४) आयकर रिटर्न भरल्याचे प्रमाणपत्र (मागील ३ वर्षाचे)

५) जी.एस.टी. रिटर्न भरल्याचे प्रमाणपत्र (मागील वर्षाचे /तिमाहीचे)

६) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र

७) चालू वित्तीय वर्षाचे व्यवसाय कर भरणा केल्याचे नोंद प्रमाणपत्र स्कॅन करून निविदेसोबत अपलोड करावी.

८) सरपंच/उपसरपंच यांच्या सहीचा स्थळ पाहणी अहवाल प्रत.

९)ऑनलाईन द्वारे निविदा फी भरल्याची नमुना ७ पावतीची प्रत.

१०)५००/- स्टॉप पेपरवर सत्यप्रतीज्ञापत्र अपलोड केलेली कागदपत्रे खरे असावे.

११)कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत नसल्याचे स्वत:च्या लेटर पॅड वर प्रतिज्ञापत्र

10) सबंधित कामाच्या निविदेमध्ये कामाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे कामाच्या किंमतीसोबत जी.एस.टी., रॉयल्टी, कामगार, विना याची रक्कम अधिक करून असेन. फक्त त्याच कामाकरिता जी.एस.टी, रॉयल्टी, कामगार विमा शासनाकडून देय असलेली रक्कम अदा करण्यात येईल.

11) कंत्राटदारांनी निविदा सादर करीत असताना सद्य परिस्थितीत काम सुरु आहे किंवा नाही याबाबतचे वर्क डन व वर्क इन हॅन्ड बाबत स्वतः साक्षांकित लेखी प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करावे. सदर प्रमाणपत्र निविदा सादर करतांना अपलोड न केल्यास तांत्रिक लिफाफा क्र.1 उघडतेवेळी आपणास निविदेमध्ये अपात्र ठरविण्यात येईल. याची निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

12) स्पर्धेतून वाटप झालेल्या कामाचे करारनामे करण्याकरिता आवश्यक सुरक्षा ठेवीच्या रकमाचे सरपंच/सचिव ग्रामपंचायत फेटरी यांचे नावे असलेले धनाकर्ष /डी.डी./निविदा फार्म/स्टॅ पेपर 07 दिवसाच्या आत या कार्यालयात सादर करावे लागेल. विहित मुदतीत आवश्यक दस्ताऐवज सादर न केल्यास वाटप झालेले काम रद्द करण्यात येईल.

13) ई-निविदा संबंधाने नमूद अटी व शर्तीमध्ये काही बदल झाल्यास ते शुद्धिपत्रकाद्वारे http://mahaetenders.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

14) कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत काम सुरु करणे व दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

15) ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र.1 आर्थिक लिफाफा क्र.2 उघडण्याच्या वेळी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांनी या कार्यालयात मूळ दस्तऐवजासह उपस्थित राहावे. निविदा उघडतांना भरणा करणारे कंत्राटदार हजर नसल्यास कार्यालया मार्फत निविदा उघडण्यात येतील याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

16) ई-निविदा उघडल्यानंतर उघडण्यात आलेल्या निविदेसंबंधी काही तक्रार असल्यास संबधित कंत्राटदाराने त्याच दिवशी आपले लेखी निवेदन या कार्यालयात सादर करावे. विहित मुदतीत आक्षेप सादर न केल्यास आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही. याची कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

17) कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणारे सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

18) कंत्राटदाराने निविदेसोबत दिलेली माहिती अचूक आहे असे गृहीत धरून करारनामा करण्यात येईल. चुकीची माहिती देवून शासनाची दिशाभूल केली किंवा कंत्राट प्राप्त केले असे आढळून आल्यास शासकीय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल व सदर निविदा रद्द करण्यात येईल.

19) मा. जिल्हाधिकरी नागपूर यांचे पत्र क्र.ख नि -३ / कक्ष-२१/कावि-१३५ /२०१७ दिनांक १७-३-२०१७ अन्वये गौण खनिजाचा वापर करणाऱ्या कंत्राटदाराला Royalty clearance certificate मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे कडून प्राप्त करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारचे शोधन करण्यात येणार नाही. रॉयल्टी चार्जेस न भरल्यास देयकातून प्रचलित शासकीय दराने कपात करण्यात येईल. याची सर्व कंत्राटदारानी नोंद घ्यावी.

20) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय संकीर्ण -२०१८/प्र क्र.१२७/इ.मा.२ दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ नुसार निविदा भरणा करतेवेळी निविदेत भरणा करत असलेली माहिती पूर्णपणे खरी असल्याबाबत १००/- रुपयाचे स्टँम्प पेपरवर निविदेत भरणा करण्यात आलेली महिती पूर्णपणे सत्य आहे, सोबत जोडण्यात आलेली,व अपलोड केलेली सर्व कागदपत्रे हि योग्य व वास्तविक आहेत, तसेच कोणत्याही विभागात काळ्या यादीत समाविष्ठ नाही याबाबतचे ॲपीडेव्हिट विहित नमुन्यात्त सादर करणे अनिवार्य राहील. याची कंत्राटदारानी नोंद घ्यावी. (सदर निविदा भरणा करतांना भरणा करण्यात आलेली माहिती चुकीची किंवा असत्य आढळल्यास आपण फौजदारी कार्यवाहीत पात्र राहाल. याची निविदा भरणा करणाऱ्यांनी नोंद घ्यावी.(याला कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. ग्रामपंचायत सक्षम प्राधिकारी जबाबदार राहणार नाहीत)

21) कंत्राटदारानी निविदा भरणा करतांना निविदेचा दर हा मधील फक्त पार्ट अ (बांधकाम बाबी) वर दराचा भरणा करावा.

22) सदर कामाकरिता आमंत्रित करण्यात आलेल्या निविदेत वेळोवेळी शासनामार्फत्त प्रदान केलेल्या सूचना /निर्णय / परिपत्रक यानुसार कार्यवाही करण्यात येईल. याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

23) सार्वजनिक बाधकाम विभाग नागपूर यांचे दरपत्रक २०१५-१६ पृष्ठ क्र.३ मधील मुद्दा क्र. ७.३ अन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असून कंत्राटदाराने ती कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा शासकीय विमा अधिकृत विमा कंपनीकडे काढणे आवश्यक राहील. अन्यथा करारनाम्याचे १% विमा रक्कम चालू देयकातून कपात करण्यात येईल. तसेच कंत्राटदारानी करारनामा करतेवेळी संपूर्ण कामाचा किंवा कामावरील कुशल/अकुशल कामगाराचा विमा काढणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापूर्वी काढलेले विमा बाबतचे आवश्यक दस्तऐवज कार्यालयात सादर करावे. संपूर्ण कामाचा/मजुराचा विमा न काढता काम सुरु असताना होणाऱ्या अपघातामुळे कामावरील कुशल/अकुशल मजुराचे झालेल्या नुकसानीची व कामाची नुकसान भरपाई करण्यास संबधित कंत्राटदार जबाबदार राहील.

24) रु.१०.०० लक्षपर्यंत कंत्राटदारांना करारनामा करताना ५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल व १० लक्ष च्या वरील मूल्य असलेल्या कामांना प्रत्येकी १ लक्ष ला १००/- प्रती लक्ष प्रमाणे स्टॅम्प पेपर द्यावे लागेल.

25) सदर कामाचा दोष निवारण कालावधी हा सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र. १५१ /इ मा -२ दिनांक १४ जानेवारी २०१९ नुसार निविदा करार पत्रातील कामातील उणीवांचा दुरुस्तीचा कालावधी निश्चित केल्यानुसार संबंधित कालावधीच्या आत कामात कोणताही दोष आढळून आल्यास कंत्राटदारास तो स्वखर्चाने दुरुस्त करून द्यावा लागेल अन्यथा सुरक्षा ठेव रकमेतून सदर दुरुस्ती खर्च भागविण्यात (कपात करण्यात) येईल.

26) सदर कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर प्रचलित नियमानुसार सर्व शासकीय कपाती देयकातून कपात करण्यात येईल.

27) वरील कामाबाबत कामाचे प्रगती नुसार मोजमाप मुल्यांकन , गुणवत्ता चाचण्या व इतर आवश्यक कागदपत्राचे पुर्ततेनंतर व देयके प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेच्या अधीन राहून देयके पारीत करण्यात येतील. निधी उपलब्ध नसल्यास देयके अदा करण्यात येणार नाही व याबाबत व्याजाची मागणी करता येणार नाही. मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही.

28) कामाची निविदा भरतांना कंत्राटदाराकडून इसारा रक्कम मधून १% रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी (करारनामा करतेवेळी) २% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून डी.डी. स्वरुपात भरणा करावी लागेल व कामाचे देयकातून २% सुरक्षा ठेव म्हणून कपात करण्यात येईल. करारनामा करतेवेळी २% सुरक्षा ठेव रक्कम न भरल्यास निविदा रद्द करण्यात येवून इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

29) कामाची निविदा उघडण्याचे दिनांकापासून पुढील ६० दिवसापर्यंत निधीग्राह्य राहील.

30) निविदा फार्म किंमत सामान्य फंड ग्रामपंचायत फेटरी चा नावे बँक ऑफ इंडिया शाखा फेटरी या राष्ट्रीय कृत बँकेत जमा करावे.(खाते क्र.874510100000910, IFSC CODE- BKID0008745)

31) ई-निविदा ऑनलाईन प्रकाशित करताना किंवा उघडतांना काही चुका झाल्यास व त्यातून काही वाद निर्माण झाल्यास ग्रामपंचायत चा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय सर्व निविदाधारकांना मंजूर असेल त्यावर कोणत्याही निविदा धारकाचे आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

टीप:- सर्व कंत्राटदार यांनी वरील दर्शवलेल्या कागदपत्रा व्यतिरिक्त इतर जास्तीची कागदपत्रे अपलोड करण्यात येवू नये. जास्तीची कागदपत्रे अपलोड केल्यास कागदपत्राची पडताळणी करतांना निविदा अपात्र ठरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. वरील अटी मान्य असल्यासच निविदा भरावी.

सरपंच
ग्राम पचायत फेटरी
त. जि नागपुर

सचिव
ग्राम पंचायत फेटरी
त.जि नागपुर

**कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत नसल्याबाबत स्वत:चे फर्मचे लेटर पॅडवर प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी खालील सही करणार निविदा धारक श्री/श्रीमती/मे ……………………………………राहणार ………… तहसील ……………जिल्हा ……………… याद्वारे असे निविदन करतो कि, मी कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयातून **Black Listed** झालेलो नसून जिल्हा परिषद नागपूर कडील निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर **Black Listed** असल्याचे आपणास निदर्शनास आल्यास माझेवर नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी पात्र राहील.

दिनांक-

ठिकाण –

निविदा धारकाची सही व शिक्का

मो.नं-.

पूर्ण पत्ता –

**( सोबत जोडलेली )अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे सत्यप्रतिज्ञापत्र ५०० रु. च्या स्टॅम्प पेपरवर**

# सत्यप्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/मे .......................................राहणार ............ तहसील ..............जिल्हा................. या सत्यप्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो कि मी , ..................................................या फर्मचा मालक असून निविदेनुसार ग्रामपंचायत ला बांधकाम करणेकरिता निविदा सादर करीत आहे. त्या निविदेचा लिफाफा क्र.१ मध्ये जी कागदपत्रे सादर केलेली आहे ती खरी बरोबर व पूर्ण आहेत. त्यामध्ये कोणत्याही . त्रुटी,चुका नाहीत याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची दिशाभूल करणारी खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील .

१) जर कंत्राट/निविदा कालावधी दरम्यान मी माझ्या कार्यालयाने किंवा कर्मचाऱ्याने ग्रामपंचायतीला कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी/बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास ,मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

२) जर कंत्राट/निविदा कालावधी दरम्यान आणि काम समाप्तीनंतर ,अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादर केलेली कोणतीही कागदपत्रे खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास , मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

३) जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी,कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी/बनावट ,फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास ,मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील

निविदा धारकाची सही व शिक्का

Signature Not Verified

Digitally signed by RAVINDRA PURUSHOTTAM KHAMBALKAR
Date: 2026.05.14 14:32:15 IST
Location: Maharashtra-MH